**पंतप्रधानांच्या हस्ते भारताच्या सहकार्याने उभारलेल्या रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटन (06 एप्रिल 2025)**

06 एप्रिल 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी आणि श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष महामहिम अनुरा कुमारा दिसनायके आज अनुराधापुरा येथे भारताच्या सहकार्याने बांधलेल्या दोन रेल्वे प्रकल्पांच्या उद्घाटन आणि शुभारंभ समारंभात सहभागी झाले होते.

2. यावेळी उभय नेत्यांनी 91.27 दशलक्ष अमेरिकन डॉलर्स खर्चाच्या, आणि भारताच्या सहकार्याने नूतनीकरण केलेल्या 128 किलोमीटर लांबीच्या माहो-ओमंथाई रेल्वे मार्गाचे उद्घाटन केले. त्यानंतर त्यांनी 14.89 दशलक्ष अमेरिकन डॉलर्स खर्चाच्या आणि भारताकडून मिळालेल्या अनुदानाच्या मदतीने बांधल्या जात असलेल्या माहो ते अनुराधापुरा पर्यंतच्या प्रगत सिग्नल यंत्रणेच्या बांधकामाचाही शुभारंभ केला.

3. हे ऐतिहासिक रेल्वे आधुनिकीकरण प्रकल्प भारत – श्रीलंका विकास भागीदारीअंतर्गत राबवले गेले आहेत. हे प्रकल्प श्रीलंकेच्या उत्तर-दक्षिण भागातली रेल्वे कनेक्टिव्हिटी मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरले आहेत. या प्रकल्पांमुळे श्रीलंकेतील प्रवासी तसेच मालवाहतूक जलद आणि कार्यक्षम व्हायला मदत होणार आहे.

अनुराधापुरा

06 एप्रिल 2025